• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३३० • शनिवार,दि.२ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 330 • Saturday 2 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# भाजप सत्ताकाळात भ्रष्टाचार,वसुली, खोकेबाज,पक्ष फोडोफोडी -वडेट्टीवार

मुंबई । वृत्तसेवा

पुरोगामी महाराष्ट्र अशी आपल्या राज्याची ओळख आहे. परंतु गेल्या दोन वर्षात घोटाळेबाजांचा, वसुलीचा, खोकेबाजांचा, पक्ष फोडोफोडीचा, गुंडांना राजाश्रय देणारा महाराष्ट्र, अशी राज्याची नवी ओळख करण्यात शिंदे सरकारने मोठी प्रगती केली आहे, अशा शब्दांत विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी हे आरोप केले. वडेट्टीवार म्हणाले, पुण्यात नवीन मुळशी पॅटर्न सुरू झालाय. या नव्या मुळशी पॅटर्नचे खरे आश्रयदाते कोण आहेत. याचा शोध सरकारने घेतला पाहिजे. आजी माजी नेत्यांमध्ये गुन्हेगार वापरण्यावरून वाद सुरू झाले आहेत. पुण्यातल्या गुंडांना क्राईम ब्रँचच्या काही सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे मार्गदर्शन आहे. हा सेवा निवृत्त अधिकारी नोकरीत असताना आणि नोकरीत नसतानाही पुण्यातल्या टोळ्या चालवतोय. राजकीय पदाधिकाऱ्यांना नेत्यांना धमकावण्यासाठी गुंडांना पॅरोलवर सोडले जातेय. पुण्यात २०० गुंडांची परेड करण्याची वेळ आली. हे दुर्देव आहे. पुण्यात अमितेश कुमारांनी गुंडांची परेड घेतली. त्यानंतर काही दिवसातच २२०० कोटींचे ड्रग्ज सापडले.




पुण्यात ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे, विचारंवत विश्वंभर चौधरी यांच्यावर केलेला हल्ला म्हणजे दहशत निर्माण करण्याचा प्रकार आहे. दहशत निर्माण करणारी ही तालिबानी वृत्ती आहे. पत्रकारांवर ही वेळ येत असेल तर राज्यात सुरक्षित आहे कोण हा खरा प्रश्न आहे. भाजप आमदाराच्या गोळीबारामुळे, मुख्यमंत्र्यांवरील आरोपांमुळे महाराष्ट्राची मान शरमेने खाली. हे इजा-बिजा-तिजा सरकार महाराष्ट्राला उद्धवस्त करेल, अशी परिस्थीती आहे. कुख्यात गुंड हेमंत दाभेकरने चक्क वर्षा निवासस्थानी जावून भेट घेतली. याच मुख्यमंत्र्यांच्या काळात वर्षा निवासस्थानावर ड्रग प्रकरणातील आरोपीने गणपतीची आरती केली होती. याचा अर्थ महाराष्ट्रात गुंडाराज सुरू आहे, असेही ते म्हणाले. भाजप कडून राजाश्रय मिळालेल्या शिंदे गटातील गुंडांनी आज विधानसभेत एकमेकांना मारामारी करून लोकशाहीच्या मंदिराला काळीमा फासणारे कृत्य केले आहे. या सरकारने पोसलेले गुंड कंत्राटदारांना धमकावत आहेत. याबाबत कंत्राटदार संघटनांनी इतिहासात पहिल्यांदा तक्रार केली आहे. शासनाची विकासकामे राजाश्रय असलेल्या गुंडांकडून बंद पाडली जात आहेत. सरकारमधील कोल्डवॉरची जागा शस्त्र घेतील. काही दिवसांनी यांची मजल एकमेकांवर बॉम्ब फेकण्यापर्यंत जाणार आहे. इतकी सत्तेची लालसा, हव्यास या इजा-बिजा-तिजा मध्ये भरली आहे. शिवसेनेचे नेते अभिषेक घोसाळकर यांची हत्या करण्यात आली. या हत्येमागे कुणाचा हात आहे हे शोधले पाहिजे. ठाणे जिल्ह्यात संकेत भोसलेच्या अपहरणानंतर त्याला बेदम मारहाणीमुळे त्याचा मृत्यू झाला होता. जीव वाचविण्यासाठी पोलिस ठाण्यात संकेत धाव घेत होता. मात्र, पोलिसांनी ही घटना आपल्या परिसरात घडली नसल्याचे सांगून टाळाटाळ केली. पोलिसांनी वेळीच कारवाई केली असती तर संकेतचा जीव वाचू शकला असता, असा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. हा संकेत मागसवर्गीय होता. मागासवींय तरूणाची ही अवस्था कोणामुळे झाली. याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. नागपुरात्या हत्यांच सत्र थांबत नाही. नागपुरात प्रेस फोटोग्राफरची हत्या झाली. गृहमंत्र्यांची कार्यक्षमता हरवली कुठे? मुख्यमंत्री मौनात आहेत. अजितदादांना काय बोलायच कळत नाही, अशी टोलेबाजी वडेट्टीवार यांनी केली. महायुती सरकारचे गुंडांना अभय आहे. गुंडाकडून मंत्रालयात रिलबाजी केली जातेय आणि सामान्य माणूस मात्र मंत्रालयाबाहेर रांगेत उभा आहे. सत्ताधारी पक्षाचा नेता आई आणि मुलीवर बलात्कार करतो. त्यावर कोणी बोलत नाही या संपूर्ण प्रकरणांची चौकशी झाली पाहिजे. मुंबईमध्ये ऑर्केस्ट्राच्या आडून सर्रास डान्स बार चालवले जात आहेत. नियम धाब्यावर बसवून पहाटे पाचपर्यंत डान्सबार सुरू आहेत. मुंबईतील या डान्सबारना पोलीसांचा आशिर्वाद आहे. चिपळूणमध्ये सरकारच्या आशीर्वादाने

# फडणवीस राजकारणाला लागलेली वाळवी -ठाकरे गट

मुबई । वृत्तसेवा

सरकारतर्फे महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे आज आणि उद्या होणाऱ्या या मेळाव्यासाठी स्थानिक खासदार सुप्रिया सुळे आणि बारामतीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना निमंत्रण मिळालेलं नाही. याप्रकरणावरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज्य सरकारवर सडकून टीका केलीय. उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. यावेळी बोलताना त्यांनी,अशा प्रकाराचं राजकारण ही महाराष्ट्राची संस्कृती कधीच नव्हती. सरकारी कार्यक्रमात सत्ताधारी पक्षाचा आमदार किंवा खासदार नाही म्हणून त्या व्यक्तिला बोलवायचं नाही असं कधीही होत नव्हतं. महारोजगार मेळावा हा काही यांच्या माता-पित्यांचा आहे का? अशा शब्दात त्यांनी टीका केली. तसेच महारोजगार मेळावा



सरकारी योजना आहे, ती भाजपाची किंवा शिंदे गँगची योजना नाही. विद्यमान खासदार आणि आमदार हे सरकारी योजनांचा भाग असतात. तरीही सरकार शरद पवारांना बोलवत नाही? अशा प्रकारचं घाणेरडं राजकारण हे महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीसांनी सुरु केलं आहे. त्याआधी असं डर्टी पॉलिटिक्स अलिकडे सुरु झालंय. असे त्यांनी म्हटले. हा कोणता खेळ चालला आहे राज्यात? पैसे तुमच्या घरच्या झाडाला आलेत का? वर्षा बंगल्यावर, सागर बंगल्यावर, देवगिरी बंगल्यावर जी झाडं आहे त्यांना खोके लागलेत का? तिथे जमिनीतून खोके उगवत आहेत का? मर्जीप्रमाणे कार्यक्रम कराल आणि स्थानिक आमदार, खासदारांना निमंत्रण देत नाही हा कुठला प्रकार आहे? केंद्रात नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात फडणवीस हे दोन वीर, महानुभव सत्तेत आल्यापासून ही वाळवी सुसंस्कृत राजकारणाला लागली आहे.



मुंबई - विधीमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनात मराठवाड्यासह बीड मतदार संघातील विविध प्रश्नांविषयी चर्चा करताना बीड विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आ.संदीप क्षीरसागर दिसून आले. यावेळी विधीमंडळातील सहकारी आमदारांसोबत विविध विषयांवर वार्तालाप केला.

# द्वारकादास मंत्री बँकेत ठेवी ११६ कोटी, रोख व गुंतवणूक १२८ कोटी -आदित्य सारडा

बीड । प्रतिनिधी

बीड : द्वारकादास मंत्री ना. सहकारी बँकेकडे संपुर्ण जनतेचे माहे फेब्रुवारी - २०२४ अखेर डिपॉझीट ११६ कोटी २२ लाख आहे तर बँकेकडे रोख व इतर बँकेतील शिल्लक व गव्हेंमेंट सिक्युरिटी असे मिळून एकशे अठठाविस कोटी त्रेपन्न लाख एवढे आहेत म्हणजे १२ कोटी २१ लाख बँकेकडे सर्व ठेवी परत देवुनही शिल्लक राहतील अधिक बँकेकडे नव्वद कोटी अडोतीस लाख एवढे कर्ज येणे बाकी आहे. अश्या प्रकारे बँक फेब्रुवारी अखेरीस आर्थिक दृष्टया सक्षम असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांनी दिली.

यापुढे बालताना डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, बँकेची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे. बँकेवर प्रशासक नियुक्ती झाली त्यानंतर बँकेची निवडणुक झाल्यावर म्हणजे ०६/०१/२०२३ या तारखेला संचालकांनी



बँकेचा चार्ज आपल्या हाती घेतला व अध्यक्ष व उपाध्याक्षांची निवड १३/०१/२०२३ या दिवशी झाली व त्यानंतर बँकेचा कारभार हा नविन निवडून आलेल्या संचालक मंडळाने करण्यास सुरुवात केली. वसुलीच्या बाबतीत कडक धोरण असल्यामुळे बँकेच्या आर्थिक परिस्थितीमध्ये मोठा बदल झाला. १० ते २० वर्षापासुनचे थकीत कर्जदार ज्यामुळे बँकेचे बॅलन्स शिट रिझर्व्ह बँकेच्या दृष्टिने वाईट आले होते ते फक्त थकीत कर्ज वसुली केल्यामुळे बँकेचे आर्थिक परिस्थिती उत्तम झाली त्याचे उदाहरण माहे फेब्रुवारी २०२४ अखेर जनतेच्या ठेवी बँकेकडे ११६ कोटी तर बँकेकडे शिल्लक व इतर बँकेतील रकमा १२८ कोटी म्हणजे सर्व ठेवी जरी गेल्यातरी बँकेकडे १२ कोटी शिल्लक राहतील तर बँकेचे कर्ज येणे हे ९० कोटी आहे म्हणजे बँकेचे स्वतःचे भांडवल १०२ कोटी आहे (एकशे दोन कोटी) त्यामुळे बैंक किती सक्षम आहे हे सर्व जनतेच्या लक्षात येईल. संचालक बोर्डाने जवळपास एक वर्षापूर्वी बँकेचा कारभार सुरु केल्याने गेल्या ११ महिन्यात बँकेस नफा पाच कोटी सोळा लाख ऐंशी हजार एवढा भरघोस नफा झाला असून यापुढे बँक मोठयाप्रमाणात घोडदौड करणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांनी सांगितली. पुढे बालताना सांगितले की, जे आर्थिक अडचणीत असतील त्यांनी बँकेकडे कर्ज मिळण्यासाठी अर्ज करावेत त्यांना लवकरात लवकर कर्ज देण्यात येईल व जे ठेवीदार आहेत त्यांना आपल्या ठेवी कधीही परत देता येतील अशी माहिती डॉ. आदित्य सारडा यांनी दिली. मंत्री बँकेचे मा. भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. २६.०२.२०२४ रोजी सर्व आर्थिक निर्बंध उठवल्यानंतर दि. २७.०२.२०२४ रोजी रक्कम रु, ३२ लाख २८ हजार ठेवी गोळा झाली असून दि. २८.०२.२०२४ रोजी रक्कम र. ९५ लाख ७१ हजार इतकी तर दि. २९.०२.२०२४ रोजी रक्कम रु. १२९ लाख ३९ हजार असे एकूण २३७ लाख ३८ हजार इतकी ठेवी मध्ये वाढ झाली आहे एवढेच नाही तर ह्या चार दिवसाच्या कालावधी मध्ये ठेवीदाराने जवळपास रक्कम रु. ३ कोटी ५० लाख रुपयाचे मुदत ठेवीच्या पावत्या नूतनीकरण केल्या आहेत.

# भाजपाची लोकसभा निवडणुकीत दमछाक होणार

नागपूर । वृत्तसेवा

शेतपिकांच्या हमीभावासाठी स्वतंत्र कायदा करावा. स्वामिनाथन आयोगाच्या सर्व शिफारशी लागू कराव्यात या प्रमुख मागण्यांसाठी उत्तरेकडील राज्यांतील शेतकरी संघटनांचे तीव्र स्वरुपाचे दिल्ली चलो आंदोलन सुरु आहे. दोन वर्षांपूर्वी दिल्लीच्या सीमेवर शेतकऱ्यांनी असाच तळ ठोकला होता. या आंदोलनामुळे केंद्र सरकारला ३ कृषी कायदे रद्द करावे लागले. आता पुन्हा लोकसभा निवडणूक तोंडावर असताना शेतकरी संघटनांचे तीव्र आंदोलन सुरु आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांची मते किती महत्त्वाची आहेत? हे मागील काही निवडणुकांच्या निकालावर नजर टाकल्यास लक्षात येईल. राष्ट्रीय स्तरावर मोठ्या समस्यांचा धोरणांवर प्रभाव राहतो. जसे की राज्याची अर्थव्यवस्था, बँकिंग, नियमने, घोषणा आणि समाजातील विविध घटकांसाठी (गरीब, शेतकरी, मजूर) असलेल्या योजना, राष्ट्रीय सुरक्षा, परदेशी धोरण, उद्यागांसाठी साधनसुविधा, विमान, रेल्वे प्रवास आणि कर हे महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागांतील मतदारांच्या सरकारकडून मोठ्या अपेक्षा असतात. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (मनरेगा) अंमलबजावणी, शेतमालाची किमान आधारभूत किंमत (एमएसपी), दुष्काळ, पूर, अवकाळी पाऊस आणि गारपीटमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीची शेतकऱ्यांना भरपाई आदी उपाययोजना सत्ताधारी सरकारवरील विश्वास मजबूत करण्यास निर्णायक ठरतात. शेतकरी विरोधी धोरणामुळे भारतीय जनता पार्टीची लोकसभा निवडणुकीत दमछाक होणार हे स्पष्ट दिसून येत आहे.

## संपादकीय

# मृत्युदंडाची शिक्षा

२५ जानेवारी रोजी अमेरिकेतील आलाबामा राज्यात केनिथ स्मिथला नायट्रोजन गॅसद्वारे मृत्युदंड देण्यात आला. अलाबामा सरकार आणि तुरूंग प्रशासनाने ज्या प्रकारचे दावे या शिक्षेबाबत केले होते ते पूर्णपणे फोल ठरल्याने मृत्युदंडाची शिक्षा हवी की नको याबाबतीत चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले आहे. मानवी समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कायदे केले गेले आणि कायद्याचे उल्लंघन करणार्या व्यक्तींना शासन केले जाऊ लागले. त्यामध्ये मृत्युदंडाच्या शिक्षेपासून ते इतर छोट्या मोठ्या शिक्षांचा सामावेश केला गेला. दुसर्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जगात पहिल्यांदाच मानवी अधिकारावर गांभीर्याने चर्चा करण्यात आली. मनुष्याला जगण्याचा पूर्ण अधिकार आहे त्यामुळे आपण त्याचे जीवन हिरावून घेऊ शकत नाही अशा प्रकारचे युक्तिवाद अनेक राष्ट्रांकडून करण्यात आले. व्यक्तीचे जीवन हिरावून घेणारी मृत्यूदंडाची शिक्षा असावी की नसावी यावर जागतिक पातळीवर आणि कायदे तज्ज्ञांमध्ये अनेक चर्चा गेल्या सत्तर वर्षांत झाल्या आहेत. परंतु, यातील कोणतीच चर्चा आजपर्यंत सर्व सहमतीने पूर्णत्वात जाऊ शकली नाही. अमेरिकेतील अलाबामामध्ये १९९८ मध्ये एका ख्रिश्चन धर्मगुरूच्या पत्नीचा एक हजार डॉलरच्या बदल्यात सुपारी घेऊन खून केल्याच्या आरोपाखाली केनिथ स्मिथ नावाच्या व्यक्तीला न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली होती. अमेरिकेत भारताप्रमाणे मृत्युदंडासाठी फाशीचा वापर केला जात नाही. फाशीऐवजी तेथे लिथल इंजेक्शनचा (विषाचे इंजेक्शन) आणि काही राज्यात विजेचा शॉक देऊन मृत्युदंड दिला जातो. केनिथ स्मिथला २०२२ मध्ये लिथल इंजेक्शनद्वारे मृत्युदंड देण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु, तो अयशस्वी ठरला. इंजेक्शन देऊनही केनिथचा मृत्यू न झाल्यामुळे न्यायालयाच्या आदेशावरून त्याला दुसर्यांदा मृत्युदंड देण्याची तयारी करण्यात आली. परंतु, या वेळेस त्याला इंजेक्शनद्वारे मृत्यू देण्याऐवजी नायट्रोजन गॅसद्वारे मृत्युदंड देण्याचे तुरूंग प्रशासनाने ठरविले. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, त्यांनी यासाठी केनिथ स्मिथची रीतसर परवानगी घेतली होती. नायट्रोजन गॅसद्वारे मृत्युदंड देण्याची जगातील पहिलीच वेळ असल्यामुळे संपूर्ण जगाचे लक्ष केनिथ स्मिथच्या शिक्षेकडे लागले होते. तुरूंग प्रशासन आणि वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार नायट्रोजन गॅसद्वारे देण्यात येणार्या शिक्षेमुळे केनिथचा एक ते दोन मिनिटात कसलाही त्रास न होता मृत्यू होईल. परंतु, प्रत्यक्ष दर्शींनी दिलेल्या माहितीनुसार केनिथ स्मिथ जवळपास १९ मिनिटे मृत्यूशी झूंज देत होता. सदर १९ मिनिटांत त्याला अनेक यातना झाल्या, त्याने स्वतःला वाचवण्याचे सर्व प्रयत्न केले. शेवटी गुदमरून त्याचा मृत्यू झाला. केनिथ स्मिथच्या भयावह मृत्यूमुळे आलाबामा राज्य आणि तुरूंग प्रशासनाने ज्या प्रकारचे दावे नायट्रोजन गॅसवर केले होते ते संपूर्णपणे फोल ठरले. दुसर्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जगात मानवाधिकारावर व्यापक प्रमाणात चर्चा करण्यात आली. पूर्वी ज्याप्रमाणे अत्यंत क्रूरपणे मृत्युदंडाची शिक्षा विविध राष्ट्रातील गुन्हेगारांना देण्यात येत होती तशा प्रकारच्या शिक्षा अनेक राष्ट्रांनी बंद केल्या. १९९६ मध्ये आलेल्या नागरी आणि राजकीय हक्कांवरील करारातील (आयसीसीआर) कलम ७ हे क्रूरपणे दिल्या जाणार्या शिक्षांना प्रतिबंध करते. १९७६ मध्ये पोर्तुगाल, १९७८ मध्ये डेन्मार्क, १९८१ मध्ये फ्रान्स, १९८४ मध्ये अर्जेंटिना, १९८५ मध्ये ऑस्ट्रेलिया, १९८७ मध्ये हैथी, १९८९ मध्ये कंबोडिया, न्यूझीलंड आणि रोमानिया, १९९० मध्ये हंगेरी, आयर्लंड, मोझांबिक, नामिबीयासह २०२२ मध्ये झांबिया, पपुआ न्यू गिनी अशा जगातील ८५ राष्ट्रांनी आपल्या राष्ट्रातून मृत्युदंडाची शिक्षा पूर्णपणे स्थगित केली आहे. वरील राष्ट्रांशिवाय ज्या राष्ट्रांमध्ये मृत्युदंडाची शिक्षा आजही दिली जाते तेथे गुन्हेगाराला शिक्षा देताना त्याला कमीत कमी त्रास होईल याची पूर्ण काळजी घेतली जाते. अर्थातच याला पश्चिम आशियायी राष्ट्रे अपवाद आहेत. भारतामध्ये मृत्युदंड दिला जावा की नाही याबाबत अनेक मतमतांतरे आहेत. १९६७च्या विधी आयोगाच्या ३५व्या अहवालात मृत्युदंडाची शिक्षा चालू ठेवण्याची तरतूद केली होती. भारतामध्ये स्वातंत्र्यापासून जवळपास ७२० गुन्हेगारांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठविण्यात आली आहे. परंतु, यातील अनेक गुन्हेगारांची शिक्षा उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने जन्मठेप किंवा इतर शिक्षेत रूपांतरित केली असल्याचे प्रकर्षाने जाणविते.

१९८०च्या बच्चन सिंग वि. पंजाब राज्य या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा ही दुर्मिळातील दुर्मिळ गुन्ह्यांसाठी देण्यात यावी अशी मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत. परंतु हे करीत असताना सर्वोच्च न्यायालयाने दुर्मिळातील दुर्मिळ शब्दाची व्याख्या मात्र दिलेली नाही. त्यामुळे कोणता गुन्हा हा दुर्मिळातील दुर्मिळ आहे आणि कोणता नाही हे ठरविण्याचे अधिकार न्यायाधीशांकडे आहेत. प्रत्येक व्यक्तीला आपले नैसर्गिक जीवन पूर्णपणे जगण्याचा अधिकार आहे. त्याने केलेल्या एखाद्या गुन्ह्यासाठी त्याला मृत्युदंड देणे योग्य नाही अशा प्रकारच्या भावना मानवाधिकार कार्यकर्ते व्यक्त करीत असतात. काही कायदे तज्ज्ञांच्या मतानुसार व्यक्तीचे जीवन हे तो ज्या राष्ट्राचा नागरिक आहे, त्या राष्ट्राची संपत्ती आहे. त्यामुळे ते ठेवणे किंवा नष्ट करण्याचा अधिकार त्या राष्ट्राकडे आहे. जगात अशा प्रकारच्या घटना अनेकदा समोर आल्या आहेत ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला एखाद्या गुन्ह्यासाठी मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली आणि नंतर ती व्यक्ती निर्दोष असल्याचे सिद्ध झाले. अशावेळी त्या व्यक्तीचे गेलेले जीवन परत कसे आणणार हा प्रश्न असतो. म्हणून आजही ज्यावेळेस जगण्याच्या अधिकारावर चर्चा केली जाते त्यावेळी मृत्युदंडाबरोबर, इच्छामृत्यू, आत्महत्येचा प्रयत्न करणे किंवा आत्महत्येसाठी प्रवृत्त करणे, प्रोत्साहित करणे अशा गोष्टींची चर्चा होते. भारतामध्ये आत्महत्या करणे किंवा एखाद्यास आत्महत्येसाठी मदत करणे किंवा प्रवृत्त करणे, प्रोत्साहन देणे.

# महासंस्कृती महोत्सव यशस्वी करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्याहस्ते सन्मान



**बीड । प्रतिनिधी**

महासंस्कृती महोत्सव अंतर्गत जिल्ह्यात दि. १९ ते २८ फेब्रुवारी पर्यंत विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करणाऱ्या प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांचा मान सन्मान जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गुरुवारी सायंकाळी छत्रपती संभाजी क्रीडांगण येथे करण्यात आला. दि. १९ ते २१ फेब्रुवारी पर्यंत विविध जिल्ह्यात क्रीडा स्पर्धांचे आयोजन झाले तर २४ फेब्रुवारीपासून ते २८ फेब्रुवारी पर्यंत पाच दिवसीय महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये स्थानिक लोक कलावंतांना मंच उपलब्ध करून देण्यात आला. जिल्ह्यातील लोकशाहीर लोककलावंतांनी त्यांच्या विविध लोककलांचे सादरीकरण यावेळी केले. यासह जागो हिंदुस्तानी ग्रुप यांचा देशभक्तीपर गीत गायनाचा कार्यक्रम, स्टँड अप कॉमेडी व कवी संमेलन, योगा मलखांब व इतर सहाजिक खेळांचे चित्तथरारक दर्शनही मंचावर झाले. सर्व कार्यक्रमांचे नियोजन करून प्रत्यक्ष यशस्वी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा यावेळी मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, कृषी अधीक्षक बाबासाहेब जेजुरकर, तहसीलदार सुहास हजारे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे-निमसरकर यांच्यासह जिल्हा प्रशासनातील कर्मचाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला.

# शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना -मुख्यमंत्री

**मुंबई । वृत्तसेवा**

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील (एनपीएस) बाजारामधील चढ-उतारामुळे निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासन स्वीकारेल असे जाहीर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा निर्णय आज विधान सभेत जाहीर केला. या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ, तसेच निवृत्तिवेतनाच्या ६० टक्के इतके कुटूंब निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ मिळणार आहे.

'हा निर्णय लाखो कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीनं महत्वाचा आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दृष्टीनंही हितकारक ठरेल,असा विश्वास मुख्यमंत्री यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच कर्मचारी संघटनांना दिलेला शब्द पाळल्याचेही नमूद केले. राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना सुधारीत करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर अभ्यास केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री निवेदनात म्हणाले की, दिलेल्या आश्वासनानुसार राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना सुधारीत करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर वित्त विभागाचे अपर मुख्य



सचिव व सेवा विभागाचे अपर मुख्य सचिव यांनी संघटनेसोबत चर्चा करुन सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेची तत्वे निश्चित केली आहेत. त्यास अधिकारी, कर्मचारी संघटनेनेही सहमती दर्शवली आहे समितीचे निष्कर्ष व शिफारशी विचारात घेऊन राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील बाजारामधील चढ-उतार यामध्ये निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्विकारावी हे शिफारशीतले तत्व मान्य करुन राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील नियत वयोमानानुसार निवृत्त होणारे कर्मचारी यांनी जर प्रस्तावित सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ तसेच निवृत्तिवेतनाच्या ६०% इतके कुटुंब निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ मिळेल याबाबतीत राज्य शासनातर्फे यथोचित कार्यवाही करण्यात येईल.' मुख्यमंत्री म्हणाले की, वयोमानानुसार निवृत्ती स्वीकारावी लागते. त्यामुळं निवृत्तीवेतन हाच अनेकांसाठी जगण्याचा आधार ठरतो. म्हणूनच सुरवातीपासूनच आम्ही या विषयावर सुरवातीपासून संवेदनशील राहीलो आहोत. निवृत्तीनंतर शासकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सन्मानपूर्वक आयुष्य जगता यावं हे तत्व मान्य केलंय. याविषयावर आम्ही राज्य सरकारी कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या विविध संघटनांशी वारंवार संवाद-संपर्कात होतो. ज्या-ज्यावेळी या संघटनांनी या विषयावर चर्चेची, बोलण्याची मागणी केली. त्या-त्यावेळी आम्ही त्यांना वेळ दिला. समितीच्या अहवालावरही बैठका घेण्यात आल्या. मंत्रिमंडळातील सहकारी, कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधीशी, तज्ज्ञांशीही चर्चा केली आहे. यात उपमुख्यमंत्री तथा तत्कालिन वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस तसेच विद्यमान वित्तमंत्री अजित पवार यांनीही सकारात्मक सूचना केल्याचेही मुख्यमंत्रानी नमूद केले. दरम्यान, मध्यंतरी केंद्राप्रमाणेच राज्यातील ८० वर्षे पूर्ण झालेल्या निवृत्तीवेतन धारकांना वाढीव निवृत्तीवेतन देण्याची मागणी तसेच २००५ मध्ये भरतीची जाहिराती निघाल्या, पण भरती प्रक्रीया पूर्ण झाली नसल्याने कालांतराने सेवेत दाखल झालेल्यांना जूनी निवृत्तवेतन योजना लागू करण्याचा निर्णय घेतल्याची माहितीही मुख्यमंत्रानी दिली. शासनाने दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू केली आहे. तसेच केंद्र शासनाप्रमाणे दिनांक १ एप्रिल २०१५ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू करण्यात आली आहे. या आर्थिक वर्षात राज्यामध्ये राज्य सरकारी कर्मचारी तसेच राज्य स्वायत्त संस्थेतील कर्मचारी यांची संख्या १३ लाख ४५ हजार इतकी असून यामध्ये राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असणारे कर्मचारी ८ लाख २७ हजार इतके आहेत. त्यावर शासनामार्फत जुन्या निवृत्तीवेतन योजनेवर ५२ हजार ६८९ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत शासनाचा हिस्सा हा ७ हजार ६८६ कोटी रुपये इतका आहे. याशिवाय एकूण वेतनावरील खर्च १ लाख २७हजार ५४४ कोटी इतका आहे. राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करणारी समिती १४ मार्च २०२३ रोजी स्थापन केली गेली होती. दिनांक१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीअंती खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजनेबाबत ही समिती शिफारसी- अहवाल सादर करणार होती. या समितीत भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी श्री. सुबोध कुमार, के. पी. बक्षी, सुधीरकुमार श्रीवास्तव तसेच लेखा व कोषागारे विभागाचे संचालक यांचा समावेश होता. या समितीनं अनेक राज्यातील परिस्थितीचा साकल्याने अभ्यास करून, अहवाल सादर केला आहे.

# राज्यातील २ लाखांहून अधिक शेतकरी सन्मान निधीसाठी अपात्र

**पुणे । वृत्तसेवा**

दोन दिवसांपूर्वी केंद्र सरकारची योजना असलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा सोळावा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला. केंद्राच्या या योजनेच्या धर्तीवर सुरू करण्यात आलेल्या नमो शेतकरी महासन्मान निधीचाही हप्ता त्याचवेळी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला आहे. पण या योजनेच्या १६ व्या हप्त्यापासून राज्यातील अनेक शेतकरी अपात्र ठरले आहेत. कृषी विभागाच्या माहितीनुसार पीएम किसान योजनेचे ८८.८२ लाख शेतकरी कुटुंबांना १९८३.७२ कोटी रूपये १६ व्या हप्त्यामध्ये वितरित करण्यात आले आहेत. तर राज्यातील २ लाख १० हजार ५८० शेतकऱ्यांना १६ वा हप्ता मिळाला नसून त्यामुळे अनेक शेतकरी चिंतेत आहेत. पण अशा शेतकऱ्यांनी चिंता करण्याची गरज नाहीये. तांत्रिक अडचणींमुळे किंवा ईकेवायसी केली नसल्यामुळे शेतकऱ्यांना पैसे मिळालेले नाहीत. ज्या शेतकऱ्यांनी आपले बँक खात्याला आधार लिंक केले नाही, ईकेवायसी केले नाही, काही कारणास्तव खाते बंद पडलेले आहे किंवा नोंदणी करण्याची प्रोसेस पूर्ण झालेली नाही अशा शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये या योजनेचे पैसे जमा झालेले नाहीत. ज्या शेतकऱ्यांची ईकेवायसी करायची राहिली असेल अशा शेतकऱ्यांनी ईकेवायसी, आधार लिंक आणि बँक खाते सुरू आहे का याची खात्री करून घ्यावी. जरी १६वा हप्ता शेतकऱ्यांना मिळाला नसेल तरी ईकेवायसी केल्यानंतर शेतकऱ्यांना हे पैसे पुढच्या हप्त्यावेळी किंवा त्याआधी वितरीत करण्यात येतात. त्यामुळे शेतकऱ्यांना घाबरून जाण्याचे किंवा चिंता करण्याचे कारण नाही. दरम्यान, राज्याच्या कृषी विभागाकडून १० मार्च पर्यंत ईकेवायसी, आधार सिडींग, नवीन नोंदणी करणाऱ्या लोकांना मान्यता देणे यासंदर्भातील मोहीम राबवण्यात आली असून सीएससी केंद्र व बँके मार्फत कामकाज सुरू ठेवण्याच्या सूचना आयुक्तालय स्तरावरून देण्यात आल्या आहेत.

# राज्यातील वयोश्री योजनेचा लाभ वयोवृध्दांनी लाभ घ्यावा

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यातील ६५ वर्ष व त्यावरील नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांच्या वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधणे/उपकरणे खरेदी करण्यासाठी तसेच मन स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री वयोश्री' योजना राबविण्यासाठी शासनाने मान्यता देण्यात आली असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त संतोष चिकणे यांनी दिली आहे. या योजनेतंर्गत लाभार्थी व्यक्ती वयाची ६५ वर्षे पूर्ण केली असतील, असे नागरिक पात्र समजण्यात येतील. लाभार्थी पात्रतेसाठी जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बीपीएल रेशन कार्ड किंवा राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृव्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत किंवा राज्य/केंद्रशासित सरकारच्या इतर कोणत्याही पेन्शन योजनेअंतर्गत वृध्दापकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याचा पुरावा सादर करु शकतो. लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.२ लाखाच्या आत असावे. सदर व्यक्तीने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारव्दारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसावे. पात्र लाभार्थ्यांच्या बँकेच्या वैयक्तीक आधार संलग्न बचत खात्यात रु.३०००/- थेट लाभ वितरण करण्यात येणार आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करण्याकरीता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सिंधुदुर्ग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिंधुदुर्गनगरी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग - ४१६८१२ या कार्यालयाशी संपर्कसाधावा. यायोजनेचा जास्तीत जास्त लाभाध्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त संतोष चिकणे यानी केल आहे.

# निवडणूक आयोगाकडून लवकरच नाशिक लोकसभा निवडणूक जाहिर

**नाशिक । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाकडून लवकरच लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केला जाणार आहे. या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील तीन लोकसभा मतदार संघांवर अक दृष्टीक्षेप नाशिक जिल्ह्यात लोकसभेकरिता २०-दिंडोरी, २१-नाशिक व ०२-धुळे (अंशत:) हे मतदार संघ समाविष्ट होतात. २०-दिंडोरी लोकसभा मतदार संघामध्ये ११३-नांदगाव, ११७ कळवण, ११८-चांदवड, ११९-येवला, १२१-निफाड, १२२-दिंडोरी हे विधानसभा मतदार संघ समाविष्ट होतात. २०-दिंडोरी लोकसभा मतदार संघ अनुसूचित जमातीकरिता राखीव असून सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ६५.६६ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजविला होता. २१-नाशिक लोकसभा मतदार संघामध्ये



१२०-सिन्नर, १२३ नाशिक पूर्व, १२४-नाशिक मध्य, १२५-नाशिक पश्चिम, १२६-देवळाली व १२७-इगतपुरी हे विधानसभा मतदार संघ समाविष्ट होतात. सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत नाशिक लोकसभा मतदार संघामध्ये ५९.४३ टक्के मतदारांनी मतदानाचा अधिकार बजविला होता. ०२-धुळे लोकसभा मतदार संघामध्ये नाशिक जिल्ह्यातील ११४-मालेगाव मध्य, ११५-मालेगाव बाह्य व११६-बागलाण हे ३ विधानसभा मतदार संघ समाविष्ट आहेत. भारत निवडणूक आयोगाकडील अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी जलज शर्मा हे नाशिक व धुळे लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहणार आहेत. तर अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधी हे दिंडोरी लोकसभा मतदार संघाकरिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहणार आहेत. तसेच प्रत्येक विधानसभा मतदार संघाकरिता भारत निवडणूक आयोगाकडील अधिसूचनेनुसार सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी निश्चित करण्यात आले आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने सदर पदावरील बहुतांश अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. एकंदरीत भारत निवडणूक आयोग यांचेकडील मार्गदर्शक सूचनांनुसार बदल्यानंतर नाशिक जिल्ह्यात बहुतांश निवडणूक संबंधित कामकाजाकरिता अधिकारी नियुक्त करण्यात आलेले असून लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ करिता नाशिक जिल्हा प्रशासन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जलज शर्मा यांचे नेतृत्वाखाली सज्ज आहे.

## संभाजी भिडेंच्या गाडीवर हल्ला

नाशिक – शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संभाजी भिडे यांची गाडी अडवत हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर येत आहेत. नाशिकच्या मनमाड येथे रात्री साडेअकराच्या सुमारास हा प्रकार समोर आला असल्याची माहिती मिळत आहे. भिडे गुरुजी हे येवला येथून मालेगावच्या दिशेने जात असतांना आंबेडकर अनुयायी त्यांची गाडी अडवली. यावेळी काळे झेंडे दाखवून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. याचवेळी आक्रमक झालेल्या काहींनी थेट भिडे यांच्या गाडीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांकडून त्यांना रोखण्याचा देखील प्रयत्न झाला. भिडे गुरुजी मालेगावला जात असतानाच नाशिकच्या मनमाड येथे त्यांचा ताफा अडवण्याचा प्रयत्न झाला. संभाजी भिडे मुर्दाबादच्या अशा घोषणा देण्यात आल्या, तसेच अश्लील शब्दातही घोषणाबाजी केली गेली. सुरवातीला काळे झेंडे दाखवण्यात आले आणि नंतर थेट भिडे यांच्या गाडीवर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. यावेळी काही तरुण आणि तरुणी थेट भीड यांच्या गाडीच्या समोर आले. त्यांची गाडी अडवून गाडीवर जोरजोराने हाताने मारत शिवीगाळ करण्यात आली. यावेळी पोलिसांनी घोषणाबाजी करणाऱ्या आणि गाडी अडवणाऱ्यांना बाजूला केले. त्यानंतर संभाजी भिडे धुळ्याकडे रवाना झाले. काळे झेंडे दाखवणाऱ्या आणि भिडे यांच्यावर गाडीवर हल्ला करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांना मनमाड पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याची माहिती मिळत आहे.

## विधानसभेत सत्ताधारी आमदारांमध्ये हाणामारी

मुंबई : राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली गेली असतानाच आता विधानसभेमध्ये सुद्धा राडा झाला आहे. विधिमंडळाचे लॉबीमध्ये शिवसेना शिंदे गटाचे आमदार एकमेकांना भिडल्याने एकच खळबळ उडाली. मंत्री दादा भुसे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांनी एकमेकांना धक्काबुक्की केली. या धक्काबुक्कीमुळे एकच खळबळ उडाली आहे. धक्काबुक्की सुरू झाल्यानंतर मंत्री शंभूराज देसाई आणि भरत गोगावले यांना मध्यस्थी करावी लागली. यामुळे आता विधानसभेमध्ये सुद्धा पोलीस लावण्याची वेळ आल्याची खोचक प्रतिक्रिया विधानसभेचे विरोधी पक्षनेते जितेंद्र आव्हाड यांनी दिली. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर हा वाद गेल्यानंतर त्यांनी महेंद्र थोरवे आणि दादा भुसे यांना एकत्र घेऊन कार्यालयामध्ये गेले. दरम्यान, हा वाद झाल्यानंतर शिंदे गटातील आमदार आणि मंत्र्यांकडून वाद झालाच नाहीत, असा दावा करण्यात आला. मध्यस्थीनंतर धावलेल्या शंभूराज देसाई यांनी हा वाद झाल्याचा पुरावा काय? असा दावा केला. ते म्हणाले की, बोलताना कोणाचा आवाज वाटलं म्हणजे वाद झाला असं नाही. योगायोगाने मी तिथे होतो. मला ते जेव्हा समजलं उंच आवाजामध्ये सुरू आहे म्हणून दोघांनाही घेऊन गेलो.

## राज्यात अवकाळीमुळे पिकांचे नुकसान

नागपूर – गेल्या दोन दिवसांपासून राज्याच्या उत्तर मध्य महाराष्ट्रात, त्याचप्रमाणे पश्चिम विदर्भातील ९ जिल्ह्यांमध्ये मोठी गारपीट झाली, या गारपिटीने तब्बल ७५ हजार हेक्टरवरील रबी पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सर्वाधिक नुकसान २१ हजार ७६८ हेक्टरवरील पिकांचे झाले आहे. त्याखालोखाल जळगाव जिल्ह्यातील सुमारे १८ हजारांहून अधिक हेक्टरचे नुकसान झाले आहे. राज्यातील नाशिक, धुळे, जळगाव, जालना, अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये अवकाळी व गारपिटीने रबी पिकांचे मोठे नुकसान केले आहे. यात गहू, हरभरा, कापूस, तूर, संत्रा, मोसंबी, केळी या पिकांचा समावेश आहे. २१ हजार ७६८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून, त्याखालोखाल जळगावत १८ हजार ८७६ हेक्टरवरील, अकोल्यातही १७ हजार ६९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.

## जनावरांची चोरी

बीड – गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाणे हद्दीत जनावरे चोरणारी टोळी सक्रिय झाली आहे. या पोलीस ठाणे हद्दीतील एका शेताखाड्यावर शेतकऱ्याने बांधलेली गाय आणि एक खिलार बैल चोरट्यांनी चोरून नेला. ही घटना २५ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजेच्या सुमारास चोपड्याची वाडी शिवारातील गावकरी आखाड्यावर घडली. या प्रकरणी बालासाहेब बळीराम कोळेकर या शेतकऱ्याने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञाताविरुद्ध २८ फेब्रुवारी रोजी तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरीला गेलेल्या गाय व खिलार बैलाची किंमत ८० हजार रुपये इतकी असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत. दरम्यान दुसऱ्या एका घटनेत गेवराई तालुक्यातील गारमाळ देवपिंप्री शिवारातील गट नं. २१९ मध्ये चोरट्यांनी एका शेतकऱ्याच्या शेतातील विहिरीवर बसवलेल्या सोलार पंपाच्या मोटारीचे केबल आणि एक विद्युत पंप चोरून नेता २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ही घटना घडली. याप्रकरणी छाया सुखदेव पारखे (रा. देवपिंपरी ता. गेवराई) यांच्या फिर्यादीवरून अज्ञाताविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# समृद्धी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्याचे लोकार्पण होणार

**मुंबई । वृत्तसेवा**

समृद्धी महामार्गाच्या भरवीर ते इगतपुरी या टप्प्याच्या लोकार्पणाचा मुहूर्त ठरला आहे. येत्या ४ मार्चला हा टप्पा वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे. त्याची तयारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने पूर्ण केली आहे. त्यामुळे समृद्धी महामार्गाने नागपूर येथून आलेल्या वाहनांना थेट इगतपुरीपर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे. समृद्धी महामार्ग ७०१ किमी लांबीचा असून त्यातील नागपूर ते शिर्डी हा ५२० किमीचा पहिला टप्पा डिसेंबर २०२२ मध्ये सुरू करण्यात आला होता. तर या



महामार्गाचा शिर्डी ते भरवीर हा दुसरा टप्पाही सुरू करण्यात आला असून, आता सुमारे ६०० किमी मार्गावरून वाहतूक सुरू आहे. एमएसआरडीसीकडून भरवीर ते इगतपुरीदरम्यानच्या २३ किलोमीटरच्या मार्गाची कामे पूर्ण झाली असून, आता तो येत्या ४ मार्चपासून सुरू केला जात आहे. त्यामुळे हा रस्ता सुरू झाल्यानंतर नागपूरहून निघालेल्या वाहनांना विनाअथडळा द्रुतगती महामार्गाने मुंबईच्या वेशीपर्यंत पोहोचता येणार आहे. एमएसआरडीसीकडून इगतपुरी ते आमनेपर्यंतच्या शेवटच्या टप्प्याचीही कामे वेगाने सुरू आहेत. सद्य:स्थितीत या मार्गाची ९० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. मात्र अभियांत्रिकीदृष्ट्या आव्हानात्मक असलेल्या एका उड्डाणपुलाचे काम पूर्ण होणे बाकी आहे. हे काम पूर्ण करून हा मार्गही जुलैपर्यंत प्रवाशांच्या सेवेत दाखल करण्यात येणार आहे. त्यातून नागपूर ते मुंबई हा संपूर्ण प्रवास समृद्धी महामार्गावरून करणे वाहनांना शक्य होणार आहे. समृद्धी महामार्गाच्या भरवीर ते इगतपुरी या टप्प्याचे लोकार्पण ४ मार्चला होत आहे. तर उर्वरित महामार्गाची कामे जुलैपर्यंत पूर्ण करून तो वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे.



आष्टी – माजी राज्यमंत्री आ.सुरेश धस यांना वाढदिवसानिमित्त सर्वपर्शी या मासिकामध्ये प्रकाशित झालेला लेख भेट देताना गांधी महाविद्यालयाचे शिनगीरे समवेत कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मधुरकर, जामगावचे सरपंच सतिश धस, आष्टी तालुका पत्रकार संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष पोकळे.

## महापुरुषांच्या विचारांच्या प्रसारासाठी अध्यासनासाठी कोट्यावधींची तरतूद

**संभाजीनगर । वृत्तसेवा**

महापुरुषांच्या विचारांचा प्रसार होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात १६ अध्यासन केंद्रांची स्थापना केलेली आहे. या अध्यासन केंद्रांना प्रतिवर्षी प्रत्येकी ६ लाख ३ हजार रुपये निधी दिला जातो. सर्व अध्यासनांसाठी १ कोटी ७ लाख रुपयांची तरतूद आहे. मात्र, मागील वर्षी या अध्यासन केंद्रांच्या संचालकांनी केवळ १ लाख २७ हजार रुपयेच खर्च केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याविषयी अधिसभा सदस्य डॉ. मुंजा धोंडगे यांनी अधिसभेच्या बैठकीत प्रश्न उपस्थित केला होता. विद्यापीठाच्या अधिसभेच्या बैठकीत सदस्य डॉ. धोंडगे यांनी अध्यासन केंद्रामध्ये प्रत्येकवर्षी ३ लाख रुपयांची तरतूद विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी केली जाते. त्यात आतापर्यंत किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली, असा प्रश्न विचारला होता. त्यावर प्रशासनाने मागील काही वर्षांत एकाही विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती दिलेली नसल्याचे स्पष्ट केले. यावर झालेल्या चर्चेत डॉ. धोंडगे यांनी शिष्यवृत्तीसाठीचे पैसे खर्च होत नसतानाच विविध कार्यक्रम, उपक्रम राबविण्यासाठीही निधी दिला जातो. अध्यासनांचे संचालक केवळ पदे घेऊन मिरवतात.

# नागरिक मोदी, भाजपाला कंटाळले

**नागपूर । वृत्तसेवा**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या यवतमाळच्या सभेसाठी सरकारी यंत्रणांचा गैरवापर केला जात आहे. आशा सेविका, महिला बचत गटाच्या सदस्यांसह अनेकांना बसमध्ये जबरदस्तीने भरून सभेला घेऊन गेले. विदर्भ मराठवाड्यातील बस मोदींच्या सभेसाठी वापरल्याने जनतेचे हाल झाले. मोदींच्या सभेचा खर्च भाजपाने करण्याऐवजी तो सरकारी तिजोरीतून करण्यात आला आहे. केवळ मंडपवरच १२ कोटी ७३ लाख ३३ हजार ५०० रुपये खर्च केला असून हेलिपॅडसाठी ३.५ कोटी रुपये खर्च केले असून ही जनतेच्या पैशाची उधळपट्टी आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. गांधी भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना नाना



पटोले म्हणाले की, स्वयंघोषीत विश्वगुरु नरेंद्र मोदी यांच्या राजकीय सभेसाठी सरकारी यंत्रणेवर दबाव आणून गर्दी जमवण्यात आली आहे. बसमध्ये महिलांना कोंबून बसवले आहे, एखाद्या वाहनात जास्त लोक बसले तर ठढज कारवाई करतात मग यांच्यावर कारवाई कोण करणार? भाजपासाठी कायदा वेगळा आहे का? जनता नरेंद्र मोदी व भाजपाला कंटाळली आहे. मोदींच्या सभेतील खुर्चीवर राहुल गांधी यांचे पोस्टर लावून जनतेने योग्य तो संदेश दिला आहे. याच यवतमाळमध्ये २०१४च्या निवडणुकीवेळी नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार, शेतमालाला दीडपट भाव देणार, स्वामीनाथन अहवाल लागू करणार, सत्तेत येताच पहिली सही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर करणार, अशी आश्वासने दिली होती परंतु सत्तेत येतात मोदी सर्व विसरले आणि तो चुनावी जुमला होता असे म्हणून शेतकऱ्यांची फसवणूक केली. यवतमाळ संतांची भूमी आहे, संतांच्या भूमित नरेंद्र मोदी खोटे बोलले. आता यवतमाळची जनता व शेतकरी मोदींच्या भुलथापांना फसणार नाहीत. नरेंद्र मोदींनी शेतकऱ्यांचा अपमान केला आहे, शेतकरीच भाजपाला त्यांची जागा दाखवून देईल. महायुतीत जागा वाटपावरुन मोठा असंतोष व गोंधळ आहे, त्यांच्यातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची एसआयटी चौकशी करण्याचे आदेश देऊन भारतीय जनता पक्षाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला आहे. मुख्यमंत्री अंतरावली सराटीत जाऊन जरांगे पाटील यांना भेटले होते त्यानंतर नवी मुंबईत जरांगेंचे उपोषण सोडले. मुख्यमंत्र्यांचा एक जडऊसतत जरांगेच्या संपर्कात होता. जरांगे पाटील हे फक्त निमित्त आहेत टार्गेट तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत, असे नाना पटोले म्हणाले. नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष संघटना मजबूत आहे, काहीजण भीतीपोटी पक्ष सोडून गेले असले तरी कार्यकर्ते व जनता काँग्रेसबरोबरच आहे. नांदेड जिल्ह्यातील तीन्ही आमदार माधवराव पाटील, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष, शहराध्यक्ष व पदाधिकारी सर्वजण काँग्रेस पक्षाबरोबरच आहेत. नांदेड जिल्हा काँग्रेस विचाराचा असून लोकसभा निवडणुकीत सक्षम उमेदवार दिला जाणार असून विजयी होणार आहे, असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे.

## विहीर मंजुरीसाठी लाच घेणाऱ्यांवर गुन्हा

**नगर । वृत्तसेवा**

शासकीय विहार मंजूर करण्यासाठी सरपंचपती असलेल्या प्राध्यापकाला १५ हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने बुधवारी रंगेहात पकडले. शामराव माणिकराव बारस्कर (वय ५३, रा. प्राध्यापक जामखेड महाविद्यालय) असे या प्राध्यापकाचे नाव असून, याप्रकरणी वाघा गावाचा ग्रामसेवक नेताजी शिवाजी भाबड (वय ५०) अशा दोघांविरोधात जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जामखेड तालुक्यातील वाघा येथील गट क्रमांक ११४ मध्ये तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे दोन हेक्टर जमीन आहे. तक्रारदार यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार योजने अंतर्गत विहिरीसाठी प्रस्ताव मौजे वाघा(ता. जामखेड) ग्रामपंचायतीत सादर केला होता. सदर प्रस्ताव तयार मंजूर करून अंतिम मंजुरीसाठी पंचायत समितीकडे पाठविण्याच्या बदल्यात ग्रामसेवक भांबड व सरपंचांचे पती प्राध्यापक बारस्कर, अशा दोघांनी तक्रारदार यांच्याकडे १५ हजारांच्या लाचेची मागणी केली. यासंदर्भात तक्रारदार यांनी अहमदनगर येथील लाचलुचपत प्रतिबंक विभागाकडे केली. त्यानुसार पडताळणीत ग्रामसेवक भांबड याने लाचेची रक्कम सरपंच पती बारस्कर याच्याकडे देण्यास सांगितल्याचे समोर आले.

# लोकसभा निवडणुकात राजकीय घडामोंडींचा मराठवाडा साक्षीदार

**संभाजीनगर । वृत्तसेवा**

१९५२ ला पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली तेव्हा मराठवाडा प्रदेश हा हैदराबाद स्टेटचा भाग होता. सहा मतदारसंघातून सात खासदार निवडले गेले होते. त्यावेळी ८६ मतदारसंघातून दोन खासदार निवडण्यात आले होते, त्यात नांदेडचा समावेश होता. देशभरात काँग्रेस उभा करील तो उमेदवार हमखास निवडून येणार असे असताना परभणी आणि बीडमधून विरोधी पक्षाचे उमेदवार विजयी झाले. साता-याचे क्रांतिसिंह नानासाहेब पाटील हे चौथ्या लोकसभेत बीडमधून विजयी झाले होते. परभणीचे रामराव लोणीकर हे यादव नाव लावत असल्याने त्यांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळत गेली, खिशात सात रुपये असताना जालन्यातून पुंडलिक हरी दानवे विजयी झाले, असे एक ना अनेक राजकीय किस्से. काँग्रेसचा गड राहिलेल्या संभाजीनगरने इंदिरा लाटेत एस काँग्रेसचे साहेबराव डोणगावकर यांना लोकसभेत पाठविले. परभणीतून अशोक देशमुख हे धनुष्यबाणावर निवडून गेल्यामुळे शिवसेनेला राष्ट्रीय पक्ष व धनुष्यबाण चिन्ह मिळाले, मशाल चिन्हावर मोरेश्वर सावे हे १९८९ ला विजयी झाले, व प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी स्थापन केलेल्या दलित मुस्लिम सुरक्षा मंचचा उमेदवार संभाजीनगरातून उभा होता, इचलकरंजीचे जयवंतराव आवळे हे होते लातूरचे खासदार या काही विशेष नोंदी. शंकरराव चव्हाण, शिवराज पाटील चाकूरकर, गोपीनाथराव मुंडे, रावसाहेब दानवे, सूर्यकांता पाटील, रजनी पाटील अशा दिग्गजांना मराठवाड्याने लोकसभेत संधी दिली. प्रारंभी काँग्रेस, जनता लाटेत जनता पक्ष, इंदिरा काँग्रेस, युती झाल्यानंतर भाजप – शिवसेनेला भक्कम साथ देणारा मतदार. १९५२ पासून आतापर्यंत अनेक राजकीय घडामोडींचा साक्षीदार असणाऱ्या मराठवाड्याचे राजकारण व घडामोडी चर्चेच्या विषय राहिल्या आहेत.

## लैंगिक बलात्कार प्रकरणातील आसाराम बापूंना सर्वोच्च न्यायालयाचा धक्का

**नागपूर । वृत्तसेवा**

लैंगिक बलात्कार प्रकरणात शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूंना आज सर्वोच्च न्यायालयाकडून दणका बसला आहे. प्रकृतीच्या कारणास्तव बलात्कार प्रकरणातील शिक्षेला स्थगिती देण्याच्या आसाराम बापूच्या याचिकेवर विचार करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. पोलीस कोठडीत असताना महाराष्ट्रातील रुग्णालयात उपचारासाठी आसारामला राजस्थान उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. महाराष्ट्रात पोलीस कोठडीत असताना आसाराम यांनी आयुर्वेदिक उपचाराचीही मागणी केली होती, त्यावर न्यायालयाने त्यांना राजस्थान उच्च न्यायालयात जाण्यास सांगितले आहे. – आसाराम यांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा न मिळण्याची ही पहिलीच वेळ नाही, याआधीही त्यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा झटका मिळाला आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर राजस्थान उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात आसाराम बापूंच्या याचिकेवर सुनावणी सुरू होती. खरे तर, आसारामला पोलिस कोठडीऐवजी स्वत:च्या इच्छेने उपचार करू दिले तर कायदा आणि सुव्यवस्था बिघडू शकते, असे सांगत उच्च न्यायालयाने शिक्षेला स्थगिती देण्याचा चौथा अर्ज फेटाळला होता.

# रोजगार हमी योजनते गैरव्यवहार करणाऱ्यांचा जामीन फेटाळला

**बीड । प्रतिनिधी**

गेवराईत तालुक्यातील रेवकी गटात रोजगार हमी योजनेच्या कामात मोठा भ्रष्टाचार उघड झाला होता. एका व्यक्तीला मजूर दाखवून फिनो बँकेतील बनावट खात्यावर निधी परस्पर वर्ग करण्यात आला होता.एवढेच नव्हे तर मयत व्यक्तींना कामावर दाखवून निधी हडप केल्याचे समोर आले होते. त्यामध्ये विलास देवकते यांच्यावर कोर्टाच्या आदेशाने ४२० यासह विविध कलमानुसार गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी विलास देवकते याचा गेवराई कोर्टाने अटकपूर्व जामीन फेटाळला आहे. खाजगी कंपनीत नोकरीला असलेल्या गेवराई तालुक्यातील हिंगणगाव येथील राजेंद्र रामराव नराडे या तरुणासह त्याच्या कुटुंबातील सदस्यांना रोजगार हमीच्या कामावर मजूर दाखवले होते. दरम्यान मजुरीची रक्कम फिनो बँकेतील बनावट खात्यावर जमा करून ती परस्पर हडप देखील केली होती. हा प्रकार संबंधित तरुणाच्या लक्षात आल्यानंतर त्याने गेवराई पोलीस ठाण्यात धाव घेऊन संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. मात्र गुन्हा दाखल न केल्याने सदरील तरुणाने कोर्टात धाव घेतली होती. त्यानुसार कोर्टात या प्रकरणातील आरोपी विलास देवकते राहणार देवकी, तालुका गेवराई जिल्हा बीड याच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर विलास देवकते याच्यावर गेवराई पोलीस ठाण्यात ४२०,४०९,४६७,४६८, ४७१, १२० ब, सह विविध कलमाने गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणावरुन गेवराई तालुक्यातील रोजगार हमीच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे स्पष्ट झाले होते. आरोपी विलास देवकते याच्या वकिलाने बीड कोर्टात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज केला होता. मात्र या प्रकरणात सखोल आणि पुर्णतः चौकशी होणे अपेक्षित आहे. आरोपीला अटकपूर्व जामीन मिळाला तर तपासकामी अडथळा निर्माण होईल अशी बाजू फिर्यादी पक्षाचे वकील निंबाळकर यांच्याकडून मांडण्यात आली होती. एकंदरीत प्रकरण लक्षात घेता, आणि दोन्ही वकिलांचा युक्तिवाद एकूण घेत, कोर्टाने विलास देवकते याचा अटकपूर्व जामीन फेटाळला आहे.

# पुरवठा निरीक्षक पदाच्या परीक्षेत हायटेक कॉपी

**बीड । प्रतिनिधी**

पुरवठा निरीक्षक पदासाठी ऑनलाइन परीक्षेमध्ये हायटेक कॉफीचा प्रकार समोर आला आहे. बीड शहरातील स्वामी विवेकानंद कॉप्युटर सेंटरमध्ये एका परीक्षार्थीकडे मायक्रो डिव्हाइस, एक मोबाइल, वॉकीटॉकी डिव्हाइस, हेडफोन असे साहित्य आढळून आले. या प्रकरणात बीड ग्रामीण ठाण्यात तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लहू मच्छिंद्र काळे (रा. बकरवाडी, ता.बीड) हा बाथरूममध्ये बराच वेळ थांबल्याने त्याच्यावर केंद्रावरील कर्मचाऱ्यांना संशय आला. तो परतल्यानंतर त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे मायक्रो डिव्हाइस व इतर साहित्य आढळून आले. त्यामुळे नायब तहसीलदार पी.सी. तांबडे, बीड तहसीलमधील अव्वल कारकून श्रीराम वायभट, संतोष मुळीक यांनी सर्व साहित्य ताब्यात घेतले. सदरील इलेक्ट्रॉनिक साहित्य बाथरूममध्ये जाऊन परिधान केल्याची कबुली परीक्षार्थी लहू काळे याने कर्मचाऱ्यांना दिली. याप्रकरणी पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी बीड ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड शहरातील स्वामी विवेकानंद कॉप्युटर सेंटरमध्ये अनेक परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जात आहेत. सदरील परीक्षा केंद्रावर सिग्नल ब्लॉकिंग यंत्रणा बसविण्यात आली आहे. यामुळे केंद्रावर मोबाइल चालत नाही. ही बाब परीक्षार्थी लहू काळे यास माहिती नसल्याने तो बाथरूमकडे सिग्नल मिळविण्यासाठी गेला व तेथे बराच वेळ तेथे थांबला. यामुळे त्याच्यावर संशय आला व त्यास वेळीच कर्मचाऱ्यांनी पकडले. यामुळे हे हायटेक कॉपी उघडकीस आली यात खूप मोठे रॅकेट असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. परीक्षार्थीचा कबुली जबाब नोंदवण्यात आला आहे.

## बीडचे तत्कालीन सीईओ झाले राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी

बीड - लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांची बुधवारी तडकाफडकी बदली करण्यात आली. त्यांच्या जागेवर एस. चोकलिंगम यांची मुख्य निवडणूक अधिकारीपदी निवड करण्यात आली. चोकलिंगम हे बीड येथे जि.प.चे सीईओ म्हणून काही महिने कार्यरत होते. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा येत्या काही दिवसांमध्ये होणार आहे. त्यासाठी केंद्रिय निवडणूक आयोगाकडून जोरदार तयारी सुरू आहे. बुधवारी अचानक श्रीकांत देशपांडे यांना मुख्य निवडणूक अधिकारी पदावरून हटविण्यात आले.

## आपआपासत दगडफेक,हाणामाऱ्या

वडवणी – हिवरगव्हाण येथील विजय उर्फ दयानंद लक्ष्मण झोडगे हा विनाकारण गांवातील लोकांना दारु पिऊन शिवागाळ करत असल्याची माहिती कळल्यानंतर वडवणी पोलीसांनी घटनास्थळी जाऊन समजावून सांगितले होते.हा प्रकार सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास घडला होता. आपआपसत मारमारी झाली यांचे रुपांतर दगडफेकीत झाले आसल्याची घटना घडली आहे. तर दोन्ही गटातील लोकांनी बेकायदेशीर जमाव जमवून हातात लाठ्या काठ्या घेऊन सार्वजनिक ठिकाणी शांतता बिघडून दंगल केली तसेच दोन्ही गटातील लोकांनी ऐकमेकांवर दगडाने मारुन जखमी केले आहे. तर जखमीना वैदयकिय प्रमाणपत्र देऊन उपाचारासाठी पाठवले आहे.तर या प्रकरणात सहाय्यक पोलीस फौजदार गौत्तम भानुदास वाघमारे यांच्या फिर्यादीवरुन मराठा समाजातील अनुरथ उर्फ बंडू नाईकवाडे, उत्तेश्वर छत्रभुज नाईकवाडे, निखिल नाईकवाडे, ज्ञानेश्वर ऊर्फे माऊली नाईकवाडे, किरण नाईकवाडे, नवनाथ उत्तरेश्वर नाईकवाडे, सर्व रा. हिवरगव्हाण व इ तर ५ ते १० लोक तसेच बौध्द समाजातील ईतर ५ ते १० लोक अशा दोन्ही गटातील वरील लोकांविरोधात विरोधात कलम ३०८, ३३६, १६०, १४३, १४७, १४८,१४९ भादवी सह कलम १३५ महा. पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये निरोप

बीड - येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप आणि आर्थिक दृष्ट्या मागास शिष्यवृत्तीत प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस.धुतालमल यांच्या अध्यक्षस्थानी आणि सचिव ॲड.व्ही.बी.मगर, रमेश आंकुटे, मुख्याध्यापक बी.ए. हावळे आणि लक्ष्मण शिंदे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी इयत्ता दहावीच्या विद्यालया मार्फत सिलींग फॅन विद्यालयास सप्रेम भेट दिला. या प्रसंगी मुख्य अतिथी ॲड.व्ही.बी. मगर यांनी 'विद्यार्थ्यांनी वास्तववादी आणि मानवतावादी दृष्टीकोन प्राप्त करुन उच्च ध्येय प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावेत' अध्यक्ष बी.एस.धुतालमल यांनी विद्यार्थ्यांनी आपले लक्ष्य निश्चित करुन, त्याच्या प्राप्तीसाठी कार्यरत राहून समाजाच्या उन्नत्तीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## देशमाने यांचे निधन

बीड – जालना जिल्ह्यातील परतुर तालुक्यातील आष्टीचे प्रतिष्ठीत नागरीक प्रेमचंद नारायण देशमाने यांचे सोमवार दि.२६ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६० वर्षे होते. दैनिक सुराज्यचे व्यवस्थापक सिद्धेश्वर सुकूमार यांचे ते मेहुणे होते. जैन समाजाचे प्रतिष्ठीत नागरिक श्री प्रेमचंद नारायण देशमाने यांचे काल आष्टी ता. परतूर जि.जालना येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ६० वर्षाचे होते. त्यांचा मनमिळाऊ स्वभावा असल्यामुळे समाजात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, तीन बहिणी असा मोठा परिवार आहे. देशमाने परिवाराच्या दु:खात दै.मराठवाडा पत्र सहभागी आहे.



बीड – राज्यसभेचे खा.डॉ.गोपछडे यांनी जोशी यांच्या घरी सदिच्छा भेट दिली त्याप्रसंगी औषध भांडार येथील सर्व कर्मचारी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## महासंस्कृती महोत्सवात पत्रकारांचा जिल्हाधिकाऱ्यांनी केला सन्मान



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन दिनांक १९ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान बीड येथे करण्यात आले. या महोत्सवाअंतर्गत विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक, कृषी कार्यक्रमांचे वार्तांकन करणाऱ्या मुद्रित माध्यम, दृकश्राव्य, समाज माध्यमातील प्रातीनिधिक प्रतिनिधींचे सन्मान आज जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन छत्रपती संभाजी क्रीडांगण येथे सन्मानीत करण्यात आले. सर्वसामान्य जनतेपर्यंत हा महोत्सव पोहोचण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाने देखील उत्कृष्ट कार्य केले. त्यामुळे प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू निमसरकर कांबळे यांनाही जिल्हाधिकारी यांच्या हस्ते मानचिन्ह गौरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, ग्रामविकास विभाग, कृषी विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महासंस्कृती महोत्सव, कृषी महोत्सव, विभागीय सरस चे आयोजन करण्यात आले. दि. १९ ते २१ पर्यंत क्रिडा महोत्सव, दि. २४ ते २८ महासंस्कृती महोत्सव आणि १ तारखे पर्यंत असणाऱ्या सरस महोत्सवाला विविध प्रसिद्धीच्या माध्यमातून जनते समोर मांडणाऱ्या प्रतिनिधींना यावेळी सन्मानीत करण्यात आले. विशेष म्हणजे विविध क्रीडा स्पर्धांमध्ये पत्रकारांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. यामध्ये ब्रिथ स्ट्रोक जलतरण स्पर्धेत तृतीय क्रमांक दै. मराठवाडा साथीचे जिल्हा प्रतिनिधी संदीप बेदरे यांचा आला आज यांनाही मानचिन्ह गौरविण्यात आले. पत्रकारांमध्ये ज्येष्ठ संपादक राजेंद्र होळकर ,पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, बालाजी तोंडे, विशाल साळुंखे, यांच्यासह कृषी मित्र पुरस्कार प्राप्त अमोल मुळे,अभिमन्यू घरत, अभिजीत नखाते, नितीन चव्हाण मुकेश झणझणे, ज्ञानोबा वायबसे वैभव जैन यांना यावेळी मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. विभागीय सरस महाराज क्रीडांगण (मल्टीपर्पज ग्राउंड) येथे सुरू आहे.

## पंकजा मुंडे नेतृत्वाच्या जोरावर केंद्रात जातील -मुनगंटीवार

**बीड । प्रतिनिधी**

प्रितम मुंडेंना राज्यसभा आणि पंकजा मुंडे यांना लोकसभा ही चर्चा कोण करतं? हे मला माहित नाही. मात्र पंकजा मुंडे एक उत्तम प्रशासक आणि उत्तम नेता आहेत. त्या संधीचं सोनं करून केंद्रात जातील, असं म्हणत दिल्लीतील शेतकर्यांचं आंदोलन म्हणजे राहुल गांधींना पडलेलं सत्ता प्राप्तीचं स्वप्न आहे. बीड येथे पदाधिकार्यांच्या बैठकीसाठी आले असता माध्यमांसोबत बोलत होते. येणार्या निवडणुकीमध्ये प्रीतम मुंडे यांना



राज्यसभा तर पंकजा मुंडे यांना लोकसभेची उमेदवारी मिळेल अशी चर्चा सुरू असल्याचा प्रश्न सुधीर मुनगंटीवार यांना विचारला असता ही चर्चा कोण करत आहे हे मला माहीत नाही आणि बीडमध्ये जी बैठक होणार आहे या बैठकीत कार्यकर्त्यांचं आणि पदाधिकार्यांचे मत जाणून घेऊन बीडच्या लोकसभेचा उमेदवार कोण असेल हे ठरवलं जाईल असं सुधीर मुनगंटीवार म्हणाले आहेत. गोपीनाथ मुंडे हयात असताना ते केंद्रीय मंत्रिमंडळात होते आणि त्यांच्यानंतर पंकजा मुंडे किंवा प्रीतम मुंडे यांना केंद्रीय मंत्रिमंडळात सामील करून घेण्याची अनेकांची भावना आहे आणि ती भावना वरिष्ठान पर्यंत आपण पोहोचवली असल्याचे सुधीर मुनगंटीवार म्हणाले आहेत पंकजा मुंडे आणि प्रीतम मुंडे या उत्तम प्रशासन आणि उत्तम नेता आहेत .

## जिल्हा रुग्णालयाला जिल्हा नियोजन समितीतून निधी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालय आवारातील महिला व बाल रूग्णांसाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मधुन २१ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेली २०० खाटांची ५ मजली ईमारत निधी अभावी फायर फिटींग व आक्सिजन पाइपलाइन कामे रखडल्याने वर्षभरापासून धुळखात पडुन आहे.याविषयी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ यांनी सहका-यांसमवेत आंदोलन करत पाठपुरावा केला होता.याची दखल घेत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडे आणि जिल्हाधिकारी दीपा मुधोळ -मुंडे यांच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे जिल्हा नियोजन समिती मधुन ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करत राखुन ठेवण्यात आला आहे.त्यामुळे लवकरच इमारतीचे रूग्णालयात रूपांतर होऊन गर्भवती महिला व बालरूग्णांची सोय होणार असल्याने हेळसांड थांबणार आहे. बीड जिल्हा रुग्णालयाची खाटांची क्षमता ३२० असली तरी आंतररुग्ण विभागात ५०० च्या जवळपास रूग्ण भरती असतात.शासनाने सर्व आरोग्य सेवा मोफत केल्याने बाह्यरुग्ण विभागात दररोज साधारण १५०० रूग्ण तपासणीसाठी येतात.जुनी रूग्णालयाची ईमारत जुनाट आणि अपुरी आहे.येथे सोनोग्राफी केंद्र असुन या केंद्राच्या समोरच्या बाजूला एक्स रे मशिन विभाग आहे.दोन्हीच्या मध्ये केवळ व्हरांडा असुन सोनोग्राफीसह एक्स रे करण्यासाठी येणाऱ्या रूग्णांची नियमितची संख्या ४०० च्या घरात आहे.यात महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर त्यामुळे गर्भवती महिलांना ताटकळत उभे रहावे लागते.गर्भवतींना याचा त्रास होतो.अपुरी जागा,अपुरे खाट व कोंदट वातावरण यामुळे गर्भवतींच्या आरोग्यावरही परीणाम होत आहे. जिल्हा रुग्णालयात महिला व बालसंगोपन केंद्राची इमारत बांधुन पुर्ण झाली असली तरी विद्युतीकरण व आक्सिजन पाइपलाइन अभावी ईमारत वर्षभरापासून वापरात नाही.नव्या इमारतीमध्ये महिलांसाठीचे सर्व विभाग व सोनोग्राफी केंद्र आदींसाठी सोय असुन त्यामुळे महिलांची सोय होणार असुन गर्भवती महिलांची हेळसांड थांबणार आहे. माता व बालसंगोपन ईमारत वापरात आणल्यास गर्भवती महिलांची हेळसांड थांबणार आहे यासाठी विद्युतीकरण व आक्सिजन पाइपलाइन अभावी धुळखात पडुन असलेली इमारत वापरात आणावी यासाठी वर्षभरापासून निवेदन तसेच आंदोलनाद्वारे पाठपुरावा करण्यात येत आहे.दरम्यान जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडे यांचा निधीसाठी आरोग्य विभाग, आरोग्य अभियान आयुक्तांकडे पाठपुरावा आणि जिल्हाधिकारी दीपा मुधोळ -मुंडे यांनी जिल्हा रुग्णालयाला भेट देत नेमकी अडचण जाणुन घेत सकारात्मक दृष्टिकोनातुन मध्यम मार्ग काढत जिल्हा नियोजन मधुन ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करत राखून ठेवला आहे.जिल्हाप्रशासनाचा दृष्टीकोन सकारात्मक असताना लोकप्रतिनिधी मात्र या प्रश्नांकडे गांभीर्याने पहात नसुन त्यांची उदासीनता दिसून येत असुन याबद्दल जनसामान्यात नाराजीचा सुर दिसुन येत आहे.

## महासंस्कृती महोत्सवात पिंपळनेर सर्कलमधील शेतकऱ्यांचा सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

येथे पार पडलेला महासंस्कृति महोत्सव तसेच कृषी महोत्सव २० २४ मध्ये बीड जिल्ह्यातील ३० प्रगतशील शेतकरी यांचा सन्मान सोहळा बीड कृषी विभागातून करण्यात आला यामध्ये रा,ईट ता, बीड जिल्हा बीड येथील प्रगतशील शेतकरी श्री रामप्रसाद अशोक डोईफोडे यांचा कृषी विभाग



यांच्याकडून सन्मान करण्यात आला. नैसर्गिक सेंद्रिय पद्धतीने शेती करून स्वतःच्या शेतात त्यांनी दशपर्णी ,निंबोळी अर्क, जीवामृत, अग्निअस्त्र ,निमास्त्र, घन जीवामृत, या सर्व निष्टाचा वापर करून नैसर्गिक शेतीकडे वाटचाल चालू केलेली आहे. अनेक प्रकारचे भाजीपाला पूर्ण नैसर्गिक पद्धतीने पिकवला जातो रासायनिकचे दुष्परिणाम पाहता आपण नैसर्गिक सेंद्रिय शेतीकडे वळले पाहिजे.

## महासंस्कृती महोत्सव क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी केले पुरस्कृत

**बीड । प्रतिनिधी**

महासंस्कृती महोत्सवानिमित्त क्रीडा स्पर्धेचे आयोजन १९ ते २१ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हाधिकारी यांच्यासह विविध शासकीय विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. जिल्हाधिकारी यांनी नेतृत्व केलेल्या थ्रोबॉल (महिला) महसूल संघ अंबाजोगाईला प्रथम क्रमांक मिळालेले आहे. क्रीडा स्पर्धेचे पुरस्कार आज छत्रपती संभाजी क्रीडांगण येथे जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, कृषी अधीक्षक बाबासाहेब जेजुरकर यांच्या हस्ते स्पर्धेतील प्रथम व द्वितीय चमूला मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात



आले. क्रिकेट (पुरुष) प्रथम क्रमांक जिल्हा परिषद क्रिकेट संघ, द्वितीय क्रमांक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कबड्डी (पुरुष) प्रथम क्रमांक जिल्हा परिषद शिक्षक संघ, द्वितीय क्रमांक महसूल संघ, कबड्डी (महिला) प्रथम क्रमांक जिल्हा परिषद शिक्षिका संघ, द्वितीय क्रमांक महसूल संघ, व्हॉलीबॉल (पुरुष) प्रथम क्रमांक महसूल संघ अंबाजोगाई, द्वितीय क्रमांक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड, द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद शिक्षिका संघ बीड, खो-खो (पुरुष) प्रथम क्रमांक जिल्हा परिषद शिक्षक संघ बीड, द्वितीय क्रमांक महसूल संघ बीड, खो खो (महिला) प्रथम क्रमांक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड, द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद शिक्षक संघ बीड, रस्सीखेच (पुरुष) प्रथम क्रमांक जिल्हा परिषद शिक्षक संघ बीड, द्वितीय क्रमांक स्वा. सावरकर महाविद्यालय बीड, रस्सीखेच (महिला) प्रथम क्रमांक जिल्हा परिषद शिक्षिका संघ बीड, द्वितीय क्रमांक महसूल संघ बीड, जलतरण (पुरुष) ५० मी. फ्री स्टाइल प्रथम क्रमांक संतोष देशमुख, द्वितीय क्रमांक प्रविण मिसाळ तृतीय क्रमांक गणेश नवले, जलतरण (पुरुष) ५० मी. बॅक स्ट्रोक प्रथम क्रमांक जितेंद्र पोथरकर, द्वितीय क्रमांक बालाजी तोंडे, तृतीय क्रमांक आर्य रघुराज श्रीमंत आणि तृतीय क्रमांक दै. मराठवाडा साथीचे जिल्हा प्रतिनिधी संदीप बेदरे यांचा आलेला आहे. जलतरण (महिला) २५ मी. फ्री स्टाइल प्रथम क्रमांक रूपाली मस्के, द्वितीय क्रमांक सारिका तारसे, तृतीय क्रमांक सुनिता ढाकणे, जलतरण (महिला) २५ मी. बॅक स्ट्रोक प्रथम क्रमांक सारिका तारसे, द्वितीय क्रमांक रूपाली मस्के, तृतीय क्रमांक सुनिता ढाकणे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com